**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०१**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :२१ /५/२०१५

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र-०१ मंगळवार दि.२६/५/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**मंगळवार दिनांक-२६/५/२०१५ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १ | मा.स्थायी समिती सभा क्र.१२ सोमवार दिनांक ३०/०३/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टारांच्या पॅनलमध्ये १) डॉ. सुवर्णा ए होसिंग , २) डॉ. प्राची देशमुख यांचा समाविष्ट करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात १) डॉ.सौरभ अनिल लिमये २) डॉ.मनिषा मनोहर गडदे ३) डॉ. सौ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांना वैदयकीय अधिकारी या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल नं.२०१ ते २०५ हे सहाय्यक कमगार आयुक्त यांचे कार्यालयाकरिता महापालिकेने भाडे तत्वावर दिले. प्रभाग समिती क्र.२,वॉर्ड क्रमांक १३, घरपट्टी सन २००३-२००४पासुन ते सन २०१४-२०१५रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अर्जदार श्री.शेख इरफान इसाकभाई भाडेकरी विठ्ठल ब्राम्हय्या किरकोन, रा. जुना मंगळवार बाजार , खाटीक गल्ली,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.२ ,वॉर्ड क्रमांक १३, बील क्रमांक ३०३/१, पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | अर्जदार श्री.बाळासाहेब आनंदराव गुंजाळ, रा. सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ , वॉर्ड क्र. ६२ चे मनपा यांच्या मंजुरीने दोन प्लॉट एकत्रित करून नवीन इमारतीचा बिल क्र.७६६ वर ओपन प्लॉट आकारणी करण्यात आल्याने बिल नं.११८६ वर रक्कम-शास्तीसह निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ७ | अर्जदार श्री.काशिनाथ दत्तु काकणे,रा.पाईपलाईन रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६२ बील क्रमांक २४४ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम-शास्तीसह निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८ | अर्जदार गोरक्ष दशरथ बेरड,रा.यशोदा नगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६२ बील क्रमांक ६४८ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम-शास्तीसह निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९ | अर्जदार श्री.बाबासाहेब रामभाउ गिरवले यांना कपिलेश्वर व्यायाम शाळेलगत असलेली १५०चौ.मी.(१३.९४चौ.मी.) मोजमापाची मोकळी जागा व्यवसायाकरिता भाडे तत्वावर दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून एक वर्ष कराराने देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १० | अहमदनगर महानगरपालिकेचे शिवपवन मंगल कार्यालय भाडेतत्वावर चालविणेस देणे कामी मागविण्यात आलेल्या जाहीर निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी.माने यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था,अहमदनगर या संस्थेकडील पाणी बिलाचे थकबाकी वरील व्याज/विलंब आकार निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- १ - मा.स्थायी समिती सभा क्र.१२ सोमवार दिनांक ३०/०३/२०१५ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- २ ते १२ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १**

विषय क्रमांक- १ मंगळवार दिनांक- २६/०५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२ सोमवार दिनांक ३०/३/२०१५ मा. स्थायी समिती रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२ सोमवार दिनांक ३०/३/२०१५ मा. स्थायी समिती रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

सभेची सूचना वाचण्यात आली.

मा. सभापती साहेब :- मागील मा.स्थायी समिती सभा क्र.१२ दिनांक ३०/३/२०१५ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे साठी विषय आहे.

मा.श्री. समद खान :- इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.श्री.कुमार वाकळे :- इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- इतिवृत्त कायम सर्वानुमते करण्यांत येत आहे.

**ठराव :-** मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२ सोमवार दिनांक ३०/३/२०१५रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १**

विषय क्रमांक- २ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टारांच्या पॅनलमध्ये १) डॉ. सुवर्णा ए होसिंग , २) डॉ. प्राची देशमुख यांचा समाविष्ट करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ** : मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह १०२५ दि.३/३/२०१५ अन्वयेचे पत्र.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह १०२५ दि.३/३/२०१५अन्वये इकडेस पत्र देवुन त्यामध्ये " कै.बा.दे.दवाखान्यासाठी शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) आठ डॉक्टरांची व्हीजीटबेसवर मा.स्थायी समिती ठराव क्र.१२६ दिनांक ३१/०८/२०१३ अन्वयेचा पारीत ठराव अन्वये व जा. क्र.आस्थापना ५०७५ दिनांक २२/१०/२०१३ दिनांक ०९/०५/२०१३ ते ०८/०५/२०१६ अखेर तीन वर्षा पॅनलशिपवर नेमणूक करणेत आलेली आहे. खालील (स्त्रीरोग तज्ञ) डॉक्टरांनी कै.बा.दे.दवाखाना येथे पॅनलशिपवर काम करणेस इच्छुक असले बाबत कै. बा. दे. दवाखाना येथे अर्ज जमा केलेले आहेत. तरी सदरचे प्राप्त अर्जाची पडताळणी व छाननी करुन खालील पात्र डॉक्टारांची यादी व अर्ज स्त्रीरोग तज्ञ डॉक्टारांच्या पॅनलमध्ये नेमणूक करणेकामी आपणाकडे पाठविण्यात येत आहे."असे नमुद केलेले आहे.

यापुर्वी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह २६१ दि.११/६/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टर म्हणुन १. डॉ.श्री.बाळासाहेब देवकर व इतर यांची अटी व शर्ती नुसार तीन वर्षा करीता पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती करीता पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे जा. क्र. आस्था.वर्कशीट ८४ दिनांक १७/६/२०१३ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२६ दिनांक ३१/८/२०१३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला होता.

"ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार १. डॉ. श्री. बाळासाहेब देवकर २. डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी ३. डॉ.सौ.मिनाक्षी करडे ४. डॉ.श्री.अमित करडे ५. डॉ.सौ.मृणाल वाघ ६. डॉ.सौ.रुपाली झावरे ७. डॉ. सौ. कांचन रच्चा ८. डॉ.सौ.रुपाली शेळके / नेमाणे यांची तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची दिनांक ९/५/२०१३ पासुन ८/५/२०१६ अखेर तीन वर्षा करीता प्रत्येक भेटीस (व्हिजीट फी) रु. २००/- ( रुपये दोनशे मात्र ) तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस (सर्जन फी) रु.१,०००/- (रुपये एक हजार मात्र) याप्रमाणे अटी व शर्ती नुसार व्हिजीट बेसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्तीस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर ,खर्च मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी."

वरील मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२६ दि.३१/८/२०१३ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टर म्हणुन १.डॉ.श्री.बाळासाहेब देवकर व इतर ७ यांची जा.क्र.आस्थापना ५०७५ दि.२२/१०/२०१३ अन्वये दि. ०९/०५/२०१३ ते दि.०८/०५/२०१६ अखेर या कालावधीमध्ये तीन वर्षा करीता प्रत्येक भेटीस व्हीजीट फी रू.२००/- व प्रत्येक शस्त्रक्रियेस (सर्जन फी) रुपये १,०००/- यावर अटी व शर्ती नुसार पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त  या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी ज्ञनेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही" असे नमुद केलेले आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह १०२५ दि.३/३/२०१५ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टारांच्या पॅनलमध्ये १.डॉ.सुवर्णा ए होसिंग २. डॉ. प्राची देशमुख यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.१२६ दि.३१/८/२०१३ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने सदर इतर उर्वरित कालावधीकरीता व्हीजीटबेसवर दर्शविलेल्या मानधनानुसार पॅनलमध्ये समाविष्ट करणे बाबत निर्णय झाल्यास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेवुन अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती बाबत कार्यवाही करणे उचित होईल. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरी मिळणे करीता निर्णयासाठी पाठविणे संयुक्तीक होईल.

तरी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह १०२५ दि.३/३/२०१५अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टारांच्या पॅनलमध्ये १. डॉ.सुवर्णा ए होसिंग २.डॉ. प्राची देशमुख यांची सदर इतर उर्वरित कालावधी करीता व्हीजीटबेसवर दर्शविलेल्या मानधनानुसार पॅनलमध्ये समाविष्ट करणेस मंजुरी करीता सदरचा प्रस्ताव हा मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय कि,या पुर्वी आस्थापना जा.क्र.५०७५दि.२२/१०/२०१३ अन्वये स्त्री रोग तज्ञ म्हणून ८ डॉक्टरांची नियुक्ती दि.९/५/२०१३ ते ८/५/२०१६ अखेर तीन वर्षा साठी केलेली आहे.सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टारांच्या पॅनलमध्ये यांचा समाविष्ट करणे विषयी प्रस्ताव आहे

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- या विषया बाबत अधिक माहिती द्या.

आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :- बाळासाहेब देशपांडें दवाखाना येथे भुलतज्ञ, स्त्रीरोग तज्ञ इत्यादी डॉक्टर पॅनलमध्ये नेमलेले आसतात.ते प्रति रूग्ण प्रति भेट या तत्वावर काम करतात.या प्रस्तावात आपण

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टारांच्या पॅनलमध्ये १) डॉ. सुवर्णा ए होसिंग , २) डॉ. प्राची देशमुख यांची सदर इतर उर्वरित कालावधी करीता व्हीजीटबेसवर दर्शविलेल्या मानधनानुसार पॅनलमध्ये समाविष्ट करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. समद खान सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१

विषय क्रमांक- ३ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात १) डॉ.सौरभ अनिल लिमये २) डॉ.मनिषा मनोहर गडदे ३) डॉ. सौ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांना वैदयकीय अधिकारी या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा.जा.क्र.१०१३ दिनांक २६/०२/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह १०१३ दि.२६/०२/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये "जा.क्र.आस्थापना कंत्राटी नेमणूक ३६५६ दिनांक ०८/०७/२०१४ अन्वये १) डॉ.सौरभ लिमये , २) डॉ. मनिषा गडदे ह्या वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने दिनांक १९/०८/२०१४ पासुन सहा महिन्यांकरीता कै.बा.दे.दवाखाना येथे हजर झालेले आहेत. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक १८/०२/२०१५ रोजी संपत आहे . तसेच आस्थापना जा.क्र. ३६५७ दिनांक १४/०८/२०१४ अन्वये डॉ. सौ. ज्योती शिंदे (सोनवणे) यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने २९/०९/२०१४ पासुन सहा महिन्या करीता नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक २८/०३/२०१५ रोजी संपत आहे. वरील वैद्यकीय अधिका-यांचे नेमणूक कालावधीमध्ये काम समाधानकराक आहे. त्यांनी पुढिल कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी १) डॉ.सौरभ लिमये,२) डॉ. मनिषा गडदे यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.२१/०२/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता व डॉ.सौ.ज्योती शिंदे (सोनवणे) यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.३१/०३/२०१५पासुन सहा महिन्या करीता कै.बा.दे.दवाखान्यासाठी वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने पुननेमणुक करणेस शिफारस आहे. " असे नमुद निर्देशित केलेले आहे.

यापुर्वी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवाखाना व सुतीका गृह जा.क्र. ८८९ दिनांक १५/०१/२०१४ अन्वयेचा प्रस्तावाच्या अनुषंगाने १) डॉ.सौरभ लिमये , २) डॉ. मनिषा गडदे ३) डॉ. सौ. ज्योती शिंदे (सोनवणे) व इतर यांची तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था / कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०८७ दिनांक ०४/०३/२०१४ व जा.क्र.आस्था / कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०८८ दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता रुपये २०.०००/- या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र.आस्था. वर्कशीट ४ दि. ३/०४/२०१४ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २५ दिनांक ८/७/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला होता.

"ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी अटी व शर्ती नुसार १) डॉ.सौरभ अनिल लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे , ३) सोनल राजेंद्र दुधेडीया / व्यवहारे यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०८७ दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये दिनांक १५/०२/२०१४ पासुन सहा महिन्या करीता व डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०८८ दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये दि.२५/०३/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता दरमहा रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर , खर्च मंजुर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करुन देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजुरी संपल्यावर संबधीतांना तांत्रिक खंड देऊन पुढील सहा महिन्या करीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रियेमधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव सहा महिन्याच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रिया सुरु करावी व ज्या पदांवर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत, त्या पदावर नव्याने जाहिरात देऊन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरती बाबत कार्यवाही करावी . नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २५ दि. ८/७/२०१४ अन्वयेच्या ठरावाच्या अनुषंगाने १) डॉ.सौरभ अनिल लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे , ३) सोनल राजेंद्र दुधेडीया / व्यवहारे यांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ३६५६ दि. १४/८/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १९/०८/२०१४ पासुन सहा महिन्यांकरीता व डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ३६५७ दि. १४/८/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक २९/०९/२०१४ पासुन सहा महिन्या करीता कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या साठी तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदांवर रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर १) डॉ.सौरभ लिमये , २) डॉ. मनिषा गडदे , ३) सोनल राजेंद्र दुधेडीया / व्यवहारे यांची वरील तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणूकीची मुदत ही दिनांक १८ / ०२ / २०१५ रोजी समाप्त झालेली आहे.

सदर डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची वरील तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणूकीची मुदत ही दि.२८/०३/२०१५ रोजी समाप्त होणार आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेचा विचार होवुन करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक ३६५६ दिनांक १४/०८/२०१४ व जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ३६५७ दिनांक १४/०८/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करिता मानधनावर खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे संबधितांची मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सद्यस्थितीमध्ये खालील प्रमाणे करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी मानधनावर कार्यरत आहेत. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | पदनाम | दरमहा मानधन | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सौरभ अनिल लिमये | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | १९/०८/२०१४ | १८/०२/२०१५ |
| २ | डॉ.मनिषा मनोहर गडदे | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | १९/०८/२०१४ | १८/०२/२०१५ |
| ३ | डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे ( सोनवणे) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | २९/०९/२०१४ | २८/०३/२०१५ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता वैद्यकीय अधिकारी यापदांची , मंजुर , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ. नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | लेडी डॉक्टर इनचार्ज | १ | १ | ------- |
| २ | लेडी डॉक्टर (पुरुष) | १ | ----- | १ |
| ३ | लेडी डॉक्टर (स्त्री) | १ | १ | -------- |
| | एकुण | ३ | २ | १ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही . " असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवे करीता सद्यस्थितीमध्ये आस्थापना कायम सुचीवर वैद्यकीय अधिकारी ही पदे अत्यंत कमी प्रमाणात मंजुर आहेत. त्यामुळे मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह १०१३ दिनांक २६/२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावामध्ये मागणी नमुद केल्यामुळे त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरीने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी १) डॉ.सौरभ अनिल लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे यांची तांत्रिक खंड देवुन दिनांक २१/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता व डॉ. सौ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची त्यांची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ३१/०३/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रुपये ६०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बादे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह १०१३ दिनांक २६/२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावा अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर खालील तक्त्यात दर्शविल्यांची त्यांची अटी व शर्ती नुसार सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन नमुद केलेल्या दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सौरभ अनिल लिमये | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| २ | डॉ.मनिषा मनोहर गडदे | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | कै.बा.दे.दवा. |
| ३ | डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे ( सोनवणे) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | कै.बा.दे.दवा. |

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर

सन २०१४-२०१५

अंदाज पत्रकीय तरतुद

**<u>लेखाशिर्ष - मानधन (ऑनररी डॉक्टर)</u>**

एकुण तरतुद रु.३४,३२,०००/-

झालेला खर्च रु. ३२,०६,४२५ /-

(माहे जाने.२०१५ पर्यत)

--------------------------------

शिल्लक तरतुद रु.२,२५,५७५/-

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय कि,मा.मुलेअ व मा.मुलेप यांचा अभिप्राय घेणेत यावा.

यावर मा. मु.ले.अ.यांचा अभिप्राय कि,मनपा अधिनियम १९४९,कलम ५३ अन्वये कार्यवाहीस्तव सादर.

यावर मु.ले.प.यांचा अभिप्राय कि,मा.स्थायी समिती ठराव क्र.२५ दिनांक ८/७/२०१४ चे ठरावाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक ठरेल.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत ) २०११चे कलम ५३ अन्वये कार्यवाहीस्तव हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त(सा)यांची सहमती दर्शक सही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,मान्य.

सबब प्रकरण स्थायी समिती सभे पुढे सादर.

----***----

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैदयकीय अधिकारी या पदांवर मानधनावर कराररबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत विषयी प्रस्ताव आहे

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- त्यांना पेमेंट वाढवून पाहिजेत.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी १) डॉ.सौरभ अनिल लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे यांची तांत्रिक खंड देवुन दिनांक २१/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता व डॉ. सौ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची त्यांची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ३१/०३/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर कराररबध्द पुर्ननियुक्ती पुर्व मंजूरी करण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १**

विषय क्रमांक- ४ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल नं.२०१ ते २०५ हे सहाय्यक कमगार आयुक्त यांचे कार्यालयाकरिता महापालिकेने भाडे तत्वावर दिले. प्रभाग समिती क्र.२,वॉर्ड क्रमांक १३, घरपट्टी सन २००३-२००४पासुन ते सन २०१४-२०१५रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२,शहर वसुली विभाग

विनंती रिपोर्ट वॉर्ड नं.१३ या विभागाचे वॉर्ड लिपीक (मदतनीस) यांचे कडून रिपोर्ट देण्यात येतो कि,वॉ.नं.१३ येथील संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल नं. २०१ते २०५हे सा.कामगार आयुक्त यांना महानगरपालिकेने भाडे तत्वावर दिले होते.सदर कार्यालय हे दुस-या जागेत स्थलांतरीत झालेले असुन त्यांनी सदरचा हॉल महानगरपालिकेला परत केलेला आहे.सदर हॉलला लावण्यात आलेली घरपटटी सन २००३-०४ पासुन कमी करण्यास मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

सोबत ताबा सोडलेले दि.१३/९/१४ चे मार्केट विभागाचे पत्र.

येणे प्रमाणे कर निरीक्षक,प्रभाग समिती क्र.२ यांचा अहवाल असे.

त्यावर प्रभाग अधिकारी क्र.२ यांचा अभिप्राय कि,रिव्हिजन विभाग

त्यावर सहाय्यक कर मुल्य निर्धारक तथा करसंकलन अधिकारी यांचा अभिप्राय कि,कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार मनपाच्या संत कैकाडी महाराज व्यापारी संकुलात हॉल नं.२०१ ते २०५ सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालया करिता भाडयाने दिला होता परंतु सन ०३/०४ पासुन सदर कार्यालय सथ्थाकॉलनी स्टेशन रोड येथे स्थलांतरीत झालेले आहे.त्यावर सन ०३/०४पासुन थकित रक्कम १८९४५१ अधिक शास्ती मुंबई प्रांतिक मनपा अधि.१९४९चे कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लोखित करण्यास मान्यतेस सादर./अ

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, करनिरीक्षक व सहाय्यक मुल्य निर्धारक तथा करसंकलन अधिकारी यांच्या शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणे योग्य राहील.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार "अ" प्रमाणे विषय मा.स्थायी समिती समोर घेणे आवश्यक आहे.मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल नं.२०१ ते २०५ हे सहाय्यक कमगार आयुक्त यांचे कार्यालयाकरिता महापालिकेने भाडे तत्वावर रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे

मा.श्री.सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.सभापती साहेब :- रक्कमा निर्लेखित करण्याचे सर्व विषय घ्या.या सर्व प्रकरणांची आपल्या संबंधित विभागाच्या कर्मचा-यांनी पहाणी व खात्री करून घेतली आहे का ?

प्रभाग समिती क्र.१ व २ प्रमुख :- होय.

मा.श्री.समद खान :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.कुमार वाकळे :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८ विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ४विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत. शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल नं.२०१ ते २०५ हे सहाय्यक कमगार आयुक्त यांचे कार्यालयाकरिता महापालिकेने भाडे तत्वावर दिले आहेत. प्रभाग समिती क्र.२,वॉर्ड क्रमांक १३, मधील या हॉलची घरपट्टी सन २००३-२००४पासुन ते सन २०१४-२०१५अखेर रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. समद खान सही /-

अनुमोदक :- मा. श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १**

विषय क्रमांक- ५ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.शेख इरफान इसाकभाई भाडेकरी विठ्ठल ब्राम्हय्या किरकोन, रा. जुना मंगळवार बाजार , खाटीक गल्ली,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.२ ,वॉर्ड क्रमांक १३, बील क्रमांक ३०३/१, पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२

विनंती रिपोर्ट की,वॉर्ड १३ बिल ३०३/१घ.क्र.३९०१ मालमत्ताधारक शेख इरफान इसाकभाई भाडेकरी विठठल ब्राम्हय्या किरकोन यांनी दि.११/३/१४ रोजी अर्ज देवून सदर जागेत नळ नाही सबब पाणीपटटी कमी करावी अशा बाबत अर्ज दिलेला आहे.

सदर अर्जानुसार पाणीपुरवठा फिटर यांनी प्रत्यक्ष पाहणी कली असता संबंधीत जागेत नळ आढळून आलेला नाही.सबब मुंबई प्रंतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार सन १४/१५ अखेर थकबाकी रू.७५७७०/- निर्लेखित करणेबाबत आदेशार्थ सादर./ अ

येणे प्रमाणे करनिरिक्षक प्रभाग समिती क्र.२ यांचा अहवाल असे.

त्यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय कि,कर निरीक्षक यांचे अहवालानुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि, करनिरीक्षक व प्र.अधिकारी प्र.स.क्र.२ यांचे शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि, विभागाने प्रस्तावित केलेनुसार नमुद "अ" प्रमाणे उक्त रक्कम निर्लेखित करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर घेणे आवश्यक आहे,तथापी मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय कि,चर्चा करावी.

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय कि,चर्चा केली त्यानुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्कमा निर्लेखित करण्याचे सर्व विषय घ्या.या सर्व प्रकरणांची आपल्या संबंधित विभागाच्या कर्मचा-यांनी पहाणी व खात्री करून घेतली आहे का ?

प्रभाग समिती क्र.१ व २ प्रमुख :- होय.

मा.श्री.समद खान :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.कुमार वाकळे :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८ विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ४विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

**ठराव :-** अर्जदार श्री.शेख इरफान इसाकभाई भाडेकरी विठ्ठल ब्राम्हय्या किरकोन, रा. जुना मंगळवार बाजार , खाटीक गल्ली,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.२ ,वॉर्ड क्रमांक १३, बील क्रमांक ३०३/१,वरील रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १**

विषय क्रमांक- ६ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.बाळासाहेब आनंदराव गुंजाळ, रा. सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ , वॉर्ड क्र. ६२ चे मनपा यांच्या मंजुरीने दोन प्लॉट एकत्रित करून नवीन इमारतीचा बिल क्र.७६६ वर ओपन प्लॉट आकारणी करण्यात आल्याने बिल नं.११८६ वर रक्कम-शास्तीसह निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी घरपट्टी वसुली विभाग.

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र.६२ चे वसुली लिपिक श्री.एम.एन.पठाण यांचकडून देण्यात येतो की,मालमत्ता वसुली वॉर्ड ६२ मधील अनुक्रमांक ११८६ वर नोंदणी असले नोंदणी असलेले मालमत्ता धारक श्री.बाळासाहेब आनंदराव गुंजाळ यानी दिनांक १६/१/२०१५ रोजी अर्ज दाखल करून एकत्रित बील मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांच्या दिनांकाच्या विनंती अर्जानुसार संगणक व म.न.पा. अभिलेखाची पडताळणी केली असता मालमत्ता वसुली वॉर्ड क्र.६२ मध्ये अनुक्रमांक ११८६वर श्री.बाळासाहेब आनंदराव गुंजाळ यांचे नावाने प्लॉट क्र.१५ ची मोकळया क्षेत्राची आकारणी आहे.तसेच क्रमांक १६ ची घरांची आकारणी निदर्शनास येते.सर्व्हे क्र.२६/७ मधील प्लॉट क्र.१५व १६ हे दोन्ही प्लॉट श्री.बाळासाहेब आनंदराव गुंजाळ यांनी खरेदी करून मा.मुख्याधिकारी ठराव क्र.३५८ दि.१५/१२/००जा.क्र.रजिष्टर विभाग ७८५दि.१९/१२/०० अन्वये नगरपरिषद दप्तरी नावांची नोंदणी करून प्लॉट क्र.१५ व १६ चे मुख्याधिकारी ठराव क्रमांक १०८ दि.३०/६/१९९७ अन्वये नगरपालिका कोषागरात पा.नं.०८७६१८दि.२६/६/१९९७ अन्वये रूपये ३,७१५/- फी भरून एकत्रित करून घेतले आहे.तरी सन १९८७ पासुन अनुक्रमांक ७६६व ११८६ नोंदणी असलेल्या दोन्ही प्लॉटचे एकत्रिकरण करून मालमत्ता कराचे बील देणे आवश्यक असतांना वेगवेगळे बीले जात आहेत.

मालमत्ता धारक यांनी मा.नगररचनाकार यांच्या कडील एकत्रिकरण प्रमाणे सदरच्या मालमत्तेवर जावक क्रमांक टी.पी. २०८३ दि.१/१०/१९९७ मा.चिफ ऑफिसर ठराव क्रमांक २२० दि.२७/९/१९९७ अन्वये बांधकाम परवानगी घेतली आहे.व अनुक्रमांक ७६६ वर घराची आकारणी झालेली आहे.व सन २०१४-२०१५ पर्यत घरपट्टी रूपये ५३,२८३ पा.क्र.AS/३९/५३१ दि.१६/१/२०१५ ने संपुर्ण भरलेली आहे.तरी अनुक्रमांक ११८६ हे भुखंडाची संपुर्ण आकारणी सन २०१४-२०१५ अखेर नोटीस फिसह कायम स्वरूपी निर्लखित करून रदद करणेस मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक वॉर्ड क्र.६२ प्र.स.क्र.१ सावेडी यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय कि,समक्ष जागा दाखवणे. तसेच प्रस्तावा मध्ये नमुद केल्या प्रमाणे संगणकाची व तत्सम कागदपत्राची पडताळणी केली असता व समक्ष पहाणी केली असता असे दिसुन येते की,सदरहू वॉर्ड नं.६२ मध्ये ११८६ वर खुला भुखंडाची आकारणी१९९५ पासुन होत होती.परंतु त्या जागेमध्ये नवीन बांधकाम करण्याकामी सन २०००-२००१ मध्ये मालमत्ता कराचा भरणा करून नांव लावण्यात N.O.C.देण्यात आलेली आहे.त्यानंतर सदर जागेस पा.नं. ०४१८५३ दि.८/११/२००० ने नांव नोंदणी करण्यात आलेली आहे.

त्यानंतर सदर जागेत नवीन बांधकाम करण्यासाठी तत्काली मुख्याधिकारी ठ.नं.१०८ दि.३०/६/१९९७ ला सर्व्हे २६/७मधील भुखंड क्र १५व १६ (अनुक्रमे बील १३३६ ,१३३७) हे एकत्री करण करण्यास परवानगी घेण्यात आलेली आहे.त्या नंतर मुख्याधिकारी (तत्कालीन न.पा.) ठ.नं.----- ने बांधकाम करून त्यांचा वापर रहिवास म्हणून करत आहेत.

सन २००३/२००४ मध्ये म.न.पा. कार्यक्षेत्राची मालमत्ताचे कर मुल्यांकरण करताना सदर जागेत खुल्या एका भुखंडाची व त्याच जागेत नवीन घर झालेल्याची आकारणी चुकुण करण्यात आलेली आहे.सबब घराचे संपुर्ण माल कराचा भरणा करून घेतलेला असुन खुल्या भुखंडाची मालमत्ता कराची आकारणीची रक्कम शास्तीसह मु.प्रा.अधि १९४९ कलम १५१ अन्वये र्निलिखीत करणे योग्य वाटते.व तशी नोंद संगणकावर करणे उचित वाटते .सबब अहवाल मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय कि,रिव्हीजन

यावर सहाय्यक मूल्य नि.क.सं.अधिकारी यांचा अभिप्राय कि,वसुली लिपीक बि.नं.११८६ चे बील व "अ" फॉर्म जोडून सादर करा.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ यांचा अभिप्राय कि,फेरसादर,वॉर्ड ऑफिसर यांजकडून सादर करण्यात येतो कि,सहाय्यक कर संकलन अधिकारी यांच्या अभिप्राय दि.१२/२ नुसार रिव्ही. विभागाकडील दप्तर खुल्या भुखंडाचा "अ"फॉर्म रि.ऑफिसर यांनी तत्कालीन यांनी न भरल्याचे दिसुन येते.परंतु रि.रजिष्टर तपासनी केली ,तशी नोंद आढळून येत आहे.प्रत जोडलेली आहे.

सबब प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर सहाय्यक मूल्य नि.क.सं.अधिकारी यांचा अभिप्राय कि,प्रभाग अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार व टी.पी. दि.७/७/९७ नुसार प्लॉ.नं. १५ व १६ एकत्रिकरण केल्याचे दिसुते.त्यानुसार म.न.पा. रेकॉर्डवर लागलेली ओपन प्लॉटची आकारणी म.न.पा. अधि १९४९ चे कलम १५१ नुसार मा.स्थायी समितीची मान्यता घेवून र्निलीखीत करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि, प्र.अ.प्र.स.क्र.१ व सहाय्य मुल्य निर्धारक तथ कर संकलन अधिकारी यांच्या शिफारशी नुसार "अ"प्रमाणे कार्यवाी करणेस हरकतनाही.

यावर मा.उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित केल्यानुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव स सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्कमा निर्लेखित करण्याचे सर्व विषय घ्या.या सर्व प्रकरणांची आपल्या संबंधित विभागाच्या कर्मचा-यांनी पहाणी व खात्री करून घेतली आहे का ?

प्रभाग समिती क्र.१ व २ प्रमुख :- होय.

मा.श्री.समद खान :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.कुमार वाकळे :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८ विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ४विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

**ठराव :-**अर्जदार श्री.बाळासाहेब आनंदराव गुंजाळ, रा. सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ , वॉर्ड क्र. ६२ चे मनपा यांच्या मंजुरीने दोन प्लॉट एकत्रित करून नवीन इमारतीचा बिल क्र.७६६ वर ओपन प्लॉट आकारणी करण्यात आल्याने बिल नं.११८६ वरील रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा. श्री.समद खान सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१**

विषय क्रमांक- ७ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.काशिनाथ दत्तु काकणे,रा.पाईपलाईन रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६२ बील क्रमांक २४४ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम-शास्तीसह निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग.

सावेडी प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभागातील वॉर्ड क्र.६२ चे वसुली लिपिक एम.एन.पठाण यांजकडून विनंती पुर्वक अहवाल सादर करण्यात येतो कि,वॉर्ड क्र.६२ मधील बील क्रमांक ६४८चे मिळकत धारक श्री.काशिनाथ दत्तु काकणे रा.पा.ला.हडको यांनी दिनांक१४/४/२०१३ रोजी अर्जाव्दारे कळविले आहे.कि,सन १९९५ ते १९९६ पासुन माझी मिळकत पा.ला.हडको मध्ये असुन सदर जागेवर २००३-२००४ पासुन नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीची आकारणी होत आहे.तरी मला पाणीपट्टी नोटीस फी सह (शास्ती) कमी करून दुरूस्त बिल देण्यात यावे असे अर्जाव्दारे कळविले आहे.

वसुली लिपिक यांनी समक्ष जागेची पाहणी केली असता सदर मालमत्ता ही रहिवास स्वरूपाची असुन तेथे कोणीही राहत नसुन कायम स्वरूपी बंद आहे.व तेथे कोणत्याही प्रकारे नळ कनेक्शन नसुन उपलब्ध रेकॉर्डची व संगणकाची पडताळणी केली असता.सन २००३-०४मध्ये संगणक प्रणाली मध्ये फिडींग करते वेळी नजर चूकीने सदर गाळयावर नळाची नोंद झालेली आहे.

वसुली लिपिक यांनी अर्जदार यांच्या दि.१७/४/२०१३ च्या अर्जानुसार संपुर्ण प्रकरण तयार करून संबंधित अधिकारी,फिटर व समक्षपहाणी अहवाल यासर्व पुर्तता करून मा.उपायुक्त यांच्या जा.क्र.११८६दि.३०/१२/२०१३ ने मा.आयुक्त साहेब यांच्या सहीस पाठविले होते.मा.आयुक्त साहेब यांच्या वर्कशिट क्रमांक १५८१ दि.३१/१२/२०१३ ला नोंद आहे.व सदर प्रकरणाची फईल तेथुन गहाळ झाल्याने पुन्हा नविन तयार केलेली आहे./अ

तरी अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर जागेची पहाणी महानगरपालिका पाणी पुरवठा फिटर यांचेकडून दि.२८/१/२०१५ रोजी केली असता सदर जागेत नळ कनेक्शन आढळून आलेले नाही.असा अहवाल इकडेस माहितीस सादर करण्यात आलेला आहे.वरील अहवाल नमुद केल्याप्रामाणे परिस्थितीत अजुन अर्जदार यांच्याकडे नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीची आकारणी चालु सन ३१मार्च २०१५अखेर रक्कम रूपये २२,७७६/-असून त्यास २टक्के द.म.शास्ती रक्कम रूपये २१,६०३/-इतकी शास्ती आकारण्यात आलेली आहे.तरी अशी रक्कम मुंबई प्रांतिक अधिनियम १९९४ लम १५२नुसार निर्लेखित करणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय कि, समक्ष जागा दाखविणे,तसेच प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे समक्ष जागेची पहाणी व चौकशी केली असता सदर जागेमध्ये नळ जोड नसल्याने दिसुन आले आहे.व तसा म्यु.पल फिटर यांचा हि पाहणी अहवाल जोडला आहे.

सबब सदरहू जागेत नळनसतांना हि पाणीपट्टी आकारणीची रक्कम शास्तीसह रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ लम १५२ अन्वये निर्लेखित करणे योग्य होईल.

तरी सदरच्या प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी मुलेप

यावर मुख्यलेखाधिकरी यांचा अभिप्राय कि,व.ली.वॉर्ड क्र.६२,करनिरीक्षक व प्र.अ.प्र.स.क्र.१ यांचे शिफारशीनुसार "अ"प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित "अ" नुसार रक्कम निर्लेखित करणेचा प्रस्ताव मे.स्थायी समिती सभेत सादर करणेस हरकत नाही आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्कमा निर्लेखित करण्याचे सर्व विषय घ्या.या सर्व प्रकरणांची आपल्या संबंधित विभागाच्या कर्मचा-यांनी पहाणी व खात्री करून घेतली आहे का ?

प्रभाग समिती क्र.१ व २ प्रमुख :- होय.

मा.श्री.समद खान :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.कुमार वाकळे :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८ विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ४विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

**ठराव :-** अर्जदार श्री.काशिनाथ दत्तु काकणे,रा.पाईपलाईन रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६२ बील क्रमांक २४४ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा. श्री.समद खान सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १**

विषय क्रमांक- ८ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार गोरक्ष दशरथ बेरड,रा.यशोदा नगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६२ बील क्रमांक ६४८ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम-शास्तीसह निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग.

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्रमांक ६२ चे वसुली लिपीक श्री.एम.एन.पठाण यांजकडून देण्यात येतो की,प्रभाग समिती क्र.१सावेडी येथील मालमत्ता कर वसुली क्रमांक ५४ मधील मालमत्ता धारक श्री.गोरख दशरथ बेरड यांनी दिनांक ७/५/२०१४व दिनांक २९/१/२०१५रोजी अर्ज दाखल करून कळविले आहे की वॉर्ड क्रमांक ६२ मधील बील क्रमांक ६४८(Z१६२०६६०१८) मध्ये नळ कनेक्शन नसतांना आकारणी केलेली पाणीपट्टी कराची रक्कम रद्द (निर्लेखित ) करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे.

मा.आयुक्त श्री.वालगुडे साहेब सावेडी वसुली येथे दि.२८/१/२०१५ रोजी दुपारी आले असता यांच्याशी सदर मालमत्ता धारक व वसुली लिपीक यांनी समक्ष चर्चा करून साहेबांच्या तोंडी आदेशानुसार संपुर्ण घरपट्टी व पाणीपट्टी शास्तीसह भरून घेवून पाणीपट्टी शास्तीसह निर्लेखित करून परतावा देण्यांस काही हरकत नाही असे सांगितले.वसुली लिपिक यांनी समक्ष जागेची पहाणी केली असता सदर मालमत्ता हि गाळा (वाणिज्य) स्वरूपाची असुन तेथे पडदे शिवणकामाचा व्यावसाय असुन तेथे कोणत्याही प्रकारच्या नळ नसुन उपलब्ध रेकॉर्ड व संगणकाची पडताळणी केली असता सन २००७/२००८पासुन संगणक प्रणाली मध्ये नजरचुकीने फिडींग करते वेळी गाळयावर नळाची नोंद झालेली आहे.मालमत्ता धारक यांचा दिनांक १९/४/२०१२ चा विनंती अर्ज प्रभाग समिती क्र.१ सावेडी येथील पाणी पुरवठा विभागाकडे नळ जोड आहे किंवा नाही याबाबत पाणी पुरवठा फिटर यांचा स्थळ पाहणी करून अहवाल प्राप्त करून घेणे पाठविले असता पाणी पुरवठा विभागाकडून दिनांक १/८/२०१४ रोजीचा अहवाल प्राप्त झालेला असुन पाणी पुरवठा फिटर यांनी सदरील मालमत्ता कर्टन शॉपी (पडदे शिवणे,पडदयाची कापड विकणे) हा व्यावसाय चालु असुन सदरील गाळयात नळ कनेक्शन आढळून येत नाही.

या बाबत अहवाल दिलेला आहे.मालमत्ता धारक श्री.गोरख दशरथ बेरड यांचेकउे ३१मार्च २०१५अखेर एकुण थकबाकी रू.३३,१८९/-(अक्षरी रूपये तेहतीस हजार एकशे एकोणनव्वद मात्र) एकुण रूपये ३३,१८९/- पा.न.AS/४४४९० ने दि.२८/१/२०१५ रोजी दि.१एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०१५ पर्यत संपुर्ण थकबाकी पाणीपट्टीसह भरलेली आहे.मालमत्ता धारक यांचा दिनांक ७/५/२०१४ व दिनांक २९/१/२०१५ च्या अर्जानुसार तसेच पाणी पुरवठा फिटर यांच्या दिनांक १/८/२०१४ समक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार सदरील मालमत्तेवर नळ जोड नसल्याने वसुली केलेली पाणीपट्टी व शास्ती रूपये २०,५४०/-(अक्षरी रूपये वीस हजार पाचशे चाळीस मात्र) रूपये मुंबई प्रंतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करणे आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल जी कोणताही कर वसुल करण्यासाठी झ ाालेल्या खर्चा बद्दल येणे असलेली जी कोणताही रक्कमत्याच्या मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल याबाबत तरतुद आहे.तथपि आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुलि लिपीक यांचा अहवाल असे.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय कि,समक्ष जागा दाखवणे तसेच प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे समक्ष जागेची पहाणी व चौकशी केली असता सदर जागेमध्ये नळजोड नसल्याचे दिसुन आले आहे व तसा म्यु.पल फिटर यांचा पाहणी अहवाल जोडला आहे.

सबब सदर जागेत नळकनेक्शन नसतांनाहि पाणीपट्टीची आकारणी करण्यात आलेली आहे.सदर पाणीपट्टीची रक्कम व शास्तीची रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम१९४९ चे कलम १५१ अन्वये निर्लेखित करणे योग्य होईल.

तरी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्र.१ यांची अभिप्राय कि,मा.मुलेप

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल कि,व.ली.करनिरीक्षक व प्र.अ.प्र.स.क्र १ पाहणीअहवाल यांचा शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित नुसार "अ" व "क्ष" प्रमाणे रक्कम निर्लेखित करण्याचा प्रस्ताव मे.स्थायी समिती सभेत सादर करणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्कमा निर्लेखित करण्याचे सर्व विषय घ्या.या सर्व प्रकरणांची आपल्या संबंधित विभागाच्या कर्मचा-यांनी पहाणी व खात्री करून घेतली आहे का ?

प्रभाग समिती क्र.१ व २ प्रमुख :- होय.

मा.श्री.समद खान :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.कुमार वाकळे :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच या विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८ विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ४विषय पत्रीकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्या बाबतचे विषय क्रमांक ४ ते ८हे विषय ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूर करण्यात यावेत.

**ठराव :-** अर्जदार दशरथ बेरड,रा.यशोदा नगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६२ बील क्रमांक ६४८ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही /-

अनुमोदक :- मा. श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १**

विषय क्रमांक-९ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.बाबासाहेब रामभाउ गिरवले यांना कपिलेश्वर व्यायाम शाळेलगत असलेली १५०चौ.मी.(१३.९४चौ.मी.) मोजमापाची मोकळी जागा व्यवसायाकरिता भाडे तत्वावर दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून एक वर्ष कराराने देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग.

विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येतो कि,श्री.बाबासाहेब रामभाउ गिरवले यांनी कपिलेश्वर व्यायाम शाळेलगत असलेली मोकळी जागा व्यावसायाकरीता भाडे तत्वावर मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

मा.नगररचनाकार यांना जा.क्र./मार्केट/४२४दिनांक २७/३/१५ अन्वये वरील मागणी केलेल्या मोकळया जागेचे दरमहा भाडे,अनामत रक्कम प्रमाणित करून देण्याबाबत कळविले होते.

मा.नगर रचनाकार यांनी १५०चौ.फुट जागा दरमहा भाडे रू.१२८०/- व अनामत रक्कत रू.६४,०००/- घेवून एक वर्ष कराराने जागा देणेस हरकत नाही असे आ.क्र./टी.पी.३०३६/दि.१/४/२०१५अन्वये इकडेस कळविले आहे.

तरी अर्जदारश्री.बाबासाहेब गिरवले यांना माळीवाडा येथील कपिलेश्वर व्यायाम शाळैलगतची १५०चौ.फुट(१३.९४चौ.मी.)या मोजमापाची मोकळी जागा दरमहा भाडे रू.१२८०/-व अनामत रक्कम रू.६४,०००/-घेवून १वर्ष कराराने देणेबाबत मंजुरीस्तव मा.स्थायी समितीसमोर घेणे.आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख,यांचा रिपोर्ट असे.

त्यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित "अ" नुसार आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कपिलेश्वर व्यायाम शाळेलगत असलेली मोकळी जागा व्यवसायाकरिता भाडे तत्वावर दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून एक वर्ष कराराने देणे विषयी प्रस्ताव आहे

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ.छाया तिवारी :- कराराने दयावयाची जागा मोकळी आहे का बांधलेली आहे?

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी एस.एस.:- मोकळी जागा आहे.

मा.सभापती साहेब :- या जागेचे दरमहाभाडे व अनामत रक्कम सांगा

मार्केट प्रमुख श्री.तांबोळी एस.एस.:- दरमहाभाडे रूपये १२८०/- व अनामत रूपये ६४,०००/- इतकी आहे.

मा.श्री. समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री.बाबासाहेब रामभाउ गिरवले यांना कपिलेश्वर व्यायाम शाळेलगत असलेली १५०चौ.फु.(१३.९४चौ.मी.) मोजमापाची मोकळी जागा व्यवसायाकरिता भाडे तत्वावर दरमहा भाडे रूपये १२८०/-व अनामत रक्कम रूपये ६४,०००/-घेवून १(एक) वर्ष कराराने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे

अनुमोदक :- मा.श्री.समद खान
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १

विषय क्रमांक- १० मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शिवपवन मंगल कार्यालय भाडेतत्वावर चालविणेस देणे कामी मागविण्यात आलेल्या जाहीर निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये सादर कि,अहमदनगर महानगरपालिकाचे शिवपवन मंगल कार्यालय भाडेतत्वावर चालविणेस देणे बाबत दै.गावकरी वर्तमान पत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.कोरे निविदा फॅर्म विक्री दिनांक २६/२/२०१५ ते ७/३/२०१५ पर्यत ठेवण्यात आली होती.मुदतीमध्ये १) समझोता युवा प्रतिष्ठान २)मातोश्री प्रतिष्ठान ३)शिववरद पुरूष बचत गट ४)श्री.समर्थ साई स्वयंरोजगार सेवा संस्था ५) विठ्ठल रूक्मीनी पुरूष बचत गट अशा एकूण ५ निविदा दाखल झाल्या होत्या.सदर प्राप्त निविदांचा तांत्रिक लिफाफा दिनांक १२/३/२०१५ मा.उपायुक्त (का) यांचे दालनात उघणेत आला.सदर कागदपत्रांची छाननी दिनांक १/४/२०१५,७/४/२०१५व ८/४/२०१५ रोजी घेण्यात आली.सदर छाननी समितीमध्ये प्राप्त निविदेपैकी १)श्री.समर्थ साई स्वयंरोजगार सेवा संस्था अ.नगर २) शिववरद पुरूष बचत गट ३) विठ्ठल रूक्मीनी पुरूष बचत गट यांची कागदपत्रे अटी शर्ती प्रमाणे पुर्तता केल्यामुळे त्यांचा व्यापारी लिफाफा दिनांक १०/४/२०१५ रोजी उघडणेत आला त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.नं. | संस्थेचे नांव | प्राप्त दर प्रति वर्ष |
|---|---|---|
| १ | विठ्ठल रूक्मीनी पुरूष बचत गट,गाडगीळ पटांगण,अ.नगर | १,३३,०००/- |
| २ | श्री.समर्थ साई स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था,मर्यादीत अ.नगर | १,२५,०००/- |
| ३ | शिववरद पुरूष बचत गट,पटवर्धन चौक,अहमदनगर. | १,२०,०००/- |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता विठ्ठल रूख्मीनी पुरूष बचत गट,गाडगीळ पटांगण,अ.नगर यांचे दर स्पर्धात्मक दृष्टया सर्वात जास्त म्हणजे रू.१,३३,०००/-इतकी आहे.निविदा उघडल्यानंतर मा.उपायुक्त कर,यांचे दालनात स्पर्धात्मक दृष्टया सर्वात जास्त दरअसलेले विठ्ठल रूक्मीनी पुरूष बचत गट यांना निविदेमध्ये दाखल केलेल्या दरापेक्षा किती जादा दर देता या बाबत विचारले असता त्यांनी त्यांच्या निविदेमध्ये दाखल केलेल्या दरापेक्षा ७,०००/- रू.जादा देण्याचे म्हणजे एकुण रू.१,४०,०००/- रूपये वार्षीक भाडे देण्यास तयार असले बाबत दि.१०/४०२०१५ रोजी लेखी पत्र देवून कळविले आहे.

तरी सदरचा तुलनात्मक तक्ता तसेच विठ्ठल रूक्मीनी पुरूष गट,यांनी प्रस्तवित केलेले रू.१,४०,०००/-चे मान्य केलेले वार्षिक भाडे बाबत अहवाल मंजुरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस व रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर./ "अ"

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता अभिप्राय कि,अहवालानुसार मान्यतेस तथा आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षा यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित "अ"प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,विभागाणे प्रस्तावित केलेनुसार सर्वधिक देकाराची निविदा छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मान्यतेस्तव मे.स्थायी समिती सभेत ठेवण्यासाठी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय कि,मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- शिवपवन मंगल कार्यालय भाडेतत्वावर चालविणेस देणे विषयी प्रस्ताव आहे

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. सचिन जाधव :- एकूण टेंडर किती आले होते, त्या पैकी जे रिजेक्ट केले ते का रिजेक्ट केले.

श्री. निंबाळकर :- जे नाकारले त्या बचत गटाकडे पासबुक, पॅनकार्डची झेरॉक्स, शॅापअॅक्ट लायसन व इतर दोन असे कागदपत्र नव्हती. तीन वेळा छाननी समिती मध्ये बचत गट उपस्थित नव्हते.

मा.श्री. सचिन जाधव :- पाच जणांना लेखी नोटीस दिली होती का.

श्री. निंबाळकर :- हो.

मा.सभापती साहेब :- ज्या गटाचे टेंडर शिफारस केले आहे त्याचे जुने शॉप ॲक्ट लायसन रिन्यअलला दिले होते.

मा.श्री. छाया तिवारी :- फेर निविदा मागवा.

मा.सभापती साहेब :- टेंडर पेक्षा जास्त रक्कम वाढवून दिली आहे.

श्री.सचिन जाधव व पाच मा.स्थायी समिती सदस्य यांनी मा.आयुक्त साहेब यांना सादर केलेल्या पत्राची सभेमध्ये नगरसचिव यांचे कडे त्या पत्राची प्रोसिडींग मध्ये नोंद घेणे करीता पुढील प्रमाणे पत्र दिले.

पत्रः- महोदय,वरिल विषयान्चये कळविण्यात येते कि,मंगळवार दि.२६/५/२०१५ रोजी सकाळी ११.००वा आयोजित केलेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.१० मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे. सदरचा विषय मंजूर झाला तर महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान दिसुन येत आहे. तसेच यामध्ये नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे बाबींची पुर्तता केलेली नाही. सदर विषयासंदर्भात कायद्याच्या तांत्रिक अडचणी आल्या व त्यामुळे जर कोणी मा.न्यायालयात गेले तर याची सर्वस्वी जबाबदारी ही मंजुरी देणारे सर्व सदस्य तसेच प्रशासनाची राहील. सदर पत्राचे वाचन हे सभापतींनी सभागृहात करण्यास सांगुन हे पत्र सर्व सदस्यांना वाचुन दाखविण्यांत यावे व या पत्राची नोंद ही प्रोसिडिंग मध्ये घेण्यात यावी. तरी सदरील विषय सभेमध्ये तहकुब ठेवण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- हा विषय तहकुब ठेवण्यात येवु नये.महानगरपालिकेच्या कार्यालयाच्या वापराचा व उत्पन्न वाढण्याचा मुद्दा आहे. त्यामुळे या पत्राची नोंद प्रोसिडींग मध्ये घेवून बहूमताने हा विषय मंजूर करावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- विरोध दर्शविणा-या पत्राची नोंद घेवून प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- विरोध दर्शविणा-या पत्राची नोंद घेवून प्रस्ताव मंजूर करावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार विठ्ठल रूख्मीणी पुरूष बचत गट,गाडगीळ पटांगण,अ.नगर यांना महानगरपालिकेचे शिवपवन मंगल कार्यालय ऑफिस रिपोर्ट सोबत असलेल्या नमुद अटी व शर्ती नुसार पाच वर्षा च्या कालावधी साठी रू.१,४०,०००/- वार्षिक भाडे आकारून आणि रक्कम रू.५०,०००/- सुरक्षा अनामत पोटी रक्कम भरून घेवून भाडेतत्वावर चालविणेस देणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

ज्या सदस्यांनी विरोध नोंदवीला आहे त्यांची नोंद करून घेण्यात आली आहे.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करावी

सुचक :- मा.श्री. समद वहाब खान सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव बहूमताने मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक -१**

विषय क्रमांक- ११ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी.माने यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , रक्तपेढी विभाग जा.क्र. २१५ दिनांक १७ / ३/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र.आस्था.५२२७ दि.२१/१०/२०१४ अन्वये रक्तपेढी विभागामध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिन्या करीता नेमणूक करण्यात आली होती. सदरच्या नेमणूकीचा कालावधी दि. १/११/२०१४ ते दि.३०/४/२०१५ असा असुन सदरचा कालावधी ३०/४/२०१५ रोजी संपत आहे.सदरच्या कालावधी मध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणूक मिळणे बाबत दि.७/३/२०१५ रोजी विनंती अर्ज केलेला आहे.तरी त्यांना नियमाप्रमाणे १ दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता वैद्यकीय अधिकारी या पदावर नेमणूक करण्यास शिफारस आहे."असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

वरील सादर केलेल्या प्रस्तावावर मा.उपायुक्त (कर) यांनी "मे.स्थायी समितीत ठेवणे बाबतची कार्यवाही करावी ." असे नमुद करून निर्देशित केलेले आहे.

यापुर्वी रक्तपेढी विभाग जा.क्र. २१८ दिनांक ४/३/२०१४ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने डॉ.गणेश बी. माने यांची तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र. आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८१ दिनांक २५/४/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक ३०/०४/२०१४ पासुन सहा महिन्या करीता रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदर केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था.वर्कशिट ७८ दिनांक ५/५/२०१४ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २८ दिनांक ८/७/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

"ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी. माने यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८१ दिनांक २५ / ०४/२०१४ अन्वये दिनांक ३०/४/२०१४ पासुन सहा महिन्या करीता दरमहा रुपये २०,०००/- या मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर ,खर्च मंजुर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करुन देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजुरी संपल्यावर संबधीतांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता मानधनावर नियुक्ती द्यावी.या प्रक्रियेमधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा.यावाढीव सहा महिन्याच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रिया सुरु करावी

व ज्या पदांवर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत , त्या पदावर नव्याने जाहिरात देऊन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरती बाबत कार्यवाही करावी . नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

सद्यस्थितीमध्ये डॉ.गणेश बी.माने यांची मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २८ दिनांक ८ / ७/२०१४ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक ५२२७ दिनांक २१/१०/२०१४ अन्वये रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवुन दिनांक ०१/११/२०१४ पासुन सहा महिन्या करीता रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर वरील संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक ३०/४/२०१५ रोजी समाप्त होणार आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभागा करीता वैद्यकीय अधिकारी या पदांची मंजुर पदे , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १ | १ | ------- |
| | एकुण | १ | १ | ------- |

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २८ दि.८/७/२०१४ अन्वयेच्या ठरावामध्ये सहा महिन्याच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रिया सुरु करावी असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

तथापि रक्तपेढी विभागा करीता वैद्यकीय अधिकारी हे पद सद्यस्थितीमध्ये रिक्त नसल्याने वैद्यकीय अधिकारी या पदांवर पदोन्नती बाबतची भरती प्रकिये बाबत कार्यवाही करता येणे अशक्य आहे.

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा. शासना कडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची - नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत

स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ." असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये वैद्यकिय अधिकारी ही पदे अत्यंत कमी प्रमाणात मंजुर असल्यामुळे नागरीकांना आपातकालीन परिस्थितीमध्ये वेळेवर तातडीने रक्त पुरवठा देणे मध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे. रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र.रक्तपेढी विभाग २१५ दिनांक १७/३/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ.गणेश बी. माने यांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन म्हणजेच दिनांक २/५/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र.रक्तपेढी विभाग २१५ दिनांक १७/३/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ. गणेश बी. माने यांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन म्हणजेच दिनांक २/५/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय कि,मा.मु.ले.अ.व मा.मु.ले.प.यांचा अभिप्राय घेणे योग्य,आदेशार्थ सादर.

यावर मा.मु.ले.अ.यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-----****------

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी.माने यांची पुर्ननियुक्ती करणे विषयी प्रस्ताव आहे

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी.माने यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता म्हणजेच दिनांक २/५/२०१५ पासुन सहा महिन्या करीता रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक -१**

विषय क्रमांक- १२ मंगळवार दि.२६/५/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था,अहमदनगर या संस्थेकडील पाणी बिलाचे थकबाकी वरील व्याज/विलंब आकार निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की,सेक्रेटरी भाउसाहेब फिरोदिया वृध्दश्रम संस्था,अहमदनगर यांचा संदर्भिय अर्ज इकडेस प्राप्त झाला असून त्या मध्ये त्यांनी भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था,औरंगाबाद रोड अहमदनगर ही संस्था सेवा भावी संस्था असून या संस्थेस महानगरपालिकेकडून पाणी पूरवठा करण्यात येत आहे.अहमदनगर महानगरपालिकेने पाणी बिलाच्या मुळ रक्कमेवर व्याज/विलंब माफ करणे बाबत यापूर्वी विनंती केलेली होती.परंतू मा.स्थायी समिती ठराव क्र.७७ दि.२४/१०/२०१३ अन्वये आमची विनंती फेटाळण्यात आलेली आहे.संस्थेला कोणतेही उत्पन्न नाही या बाबीचा सहानुभुतीपुर्वक विचार करून आमच्या संस्थेच्या पाणी बिलावर आकारलेली व्याज व विलंब आकार माफ किरण्यात यावा.मुळ मुद्दल रक्कम आम्ही भरण्यास तयार आहोत. अशी विनंती केलेली आहे.

या अनंषंगाने अहवाल सादर कि,भाउसाहेब फिरोदिया वृध्दश्रम संस्था अहमदनगर यांचे दि.१७/९/२०११ अन्वये पाणी बिलाचे थकबाकी वरील व्याज / विलंब आकार निर्लेखित करणे बाबच्या अर्जानुसार या विभागाकडून प्रस्ताव निर्णयासाठी मा. स्थायी समिती समोर सादर केला असता या अनुषंगाने मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ दि.२४/१/२०१३ चा ठराव क्र.७७ ठराव पारित झालेला आहे.

**ठराव :-** "अर्जदार भाउसाहेब फिरोदिया वृध्दश्रम संस्था,अहमदनगर या संस्थेकडील माहे ऑगस्ट २०११अखेर पाणी बिलाचे थकबाकी वरिल व्याज /विलंब आकार रक्कम रू.५,८१,४५१/- निर्लेखित करणे बाबतचा प्रस्ताव पहाता महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी संबंधीत असल्याने अर्जदार भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था,अहमदनगर या संस्थेकडील पाणी बिल वरील व्याज/विलंब आकार निर्लेखित करणेत येउ नये"

त्यामुळे वरील पारीत ठरावानुसार भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था,अहमदनगर यांची मागणी मान्य करण्यात आलेली नव्हती.

परंतु सद्यस्थितील सदरहू संस्थेने या बाबत संदर्भिय विनंती अर्ज देवून पाणी बिलाचे थकबाकी वरील व्याज/विलंब आकार निर्लेखित करणे बाबत पुन्हा मागणी केलेली आहे.संस्थेकडे मार्च २०१५ अखेर मुळ पाणी बिल आकार व्याज/विलंब आकार प्रमाणे एकूण रक्कम रूपये १०,०३,९५०/-इतकी थकबाकी आहे.त्याचा सविस्तर तपशिल खालिल प्रमाणे होत आहे.

| माहे मार्च २०१५अखेर पाणी बील | दंडात्मक रक्कम/व्याज/शास्ती | मार्च २०१५अखेर एकूण थकबाकी |
|---|---|---|
| रू.७,५७,१७५/- | रू.२,४६,७७५/- | रू.१०,०३,९५० |

वरील प्रमाणे भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था यांचे विनंती नुसार पाणी बिलाचे मुळ बिलातुन माहे मार्च २०१५ अखेर व्याज व विलंब आकार माफ करावयाचे झाल्यास मुळ पाणी बील रक्कम रूपये ७,५७,१७५/- संस्थे कडून भरून घ्यावे लागतील व रक्कम रूपये २,४६,७७५/- दंडात्मक व्याज /शास्ती बाबत माफ करणेचा पुढील निर्णय घ्यावा लागेल (सोबत माहे मार्च २०१५चे पाणी बिल जोडले आहे) /"क्ष"

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर चर्चोसाठी ठवून मा.स्थायी समितीच्या निर्णय प्रमाणे पूढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहील.आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणे प्रमाणे लिपीक पाणी पुरवठा विभाग यांचा रिपोर्ट आहे.

यावर पाणीपुरवठाविभागप्रमुख श्री.निकम यांचा अभिप्राय कि,व्याज व विलंब आकार माफी बाबतची बाब ही धोरनात्मक स्वरूपाची असल्याने,प्रस्ताव मा.स्थायीसमितीकडे सादर करणे योग्य वाटते.मान्यतेस्तव सादर यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,पाणी पुरवठा प्रमुख याचे अभिप्रायाप्रमाणे "अ"नुसार व्याज व दंड माफ बाबत मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव ठेवणेची कार्यवाही करणेस हरकत नाही.प्रस्तुत प्रकरणी मनपा अधिनियम २०११ चे कलम १५२ प्रमाणे अचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.
यावर उपयुक्त (कर) श्री.बेहरे साहेब यांचा अभिप्राय कि,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार व नमुद परिच्छेद "क्ष" प्रमाणे विषयांकीत प्रकरणी मनपाच्या अधिनियमातील १९४९ चे कलम १५२नुसार उचित कार्यवाहीकरून प्रस्ताव मे स्थायी समिती सभेत ठेवणेस हरकत नाही.मे आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त यांची अभिप्राय कि,मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था,अहमदनगर या संस्थेकडील पाणी बिलाचे थकबाकी वरील व्याज/विलंब आकार निर्लेखित करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. सचिन जाधव :- वृध्दाश्रम आहे पूर्ण रक्कम निर्लेखित करावी.

मा.श्री.संपत बारस्कर :- १००% व्याज/विलंब आकार माफ करावा तथापी यामध्ये शास्तीची रक्कम असल्यास शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा. व १५ दिवसात उर्वरित मुळ पाणी बील रक्कम रूपये ७,५७,१७५/- संस्थे कडून भरून घ्यावी .ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- व्याज विलंब आकार र्निलेखित करावा व १५ दिवसात उर्वरित मुळ पाणी बील रक्कम रूपये ७,५७,१७५/- संस्थे कडून भरून घ्यावी .ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** सभागृहातील चर्चे नुसार व ऑफिस रिपोर्ट नुसार भाउसाहेब फिरोदिया वृध्दाश्रम संस्था यांचे विनंती नुसार पाणी बिलाचे मुळ बिलातुन माहे मार्च २०१५ अखेर रक्कम रूपये २,४६,७७५/- व्याज व विलंब आकार निर्लेखित करण्यास ही सभा मान्यता देत आहे.तथापी यामध्ये शास्तीची रक्कम असल्यास शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा. व १५ दिवसात उर्वरित मुळ पाणी बील रक्कम रूपये ७,५७,१७५/- संस्थे कडून भरून घ्यावी .ऑफिस रिपोर्ट मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही /-

अनुमोदक :- मा. श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका